**महाराष्ट्र केसरी स्पर्धेत सलग ३ वेळा किताब पटकविणा-या कुस्तीपटूस पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त पदी थेट नियुक्ती देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः खेआक्ष १५१६/प्र.क्र.२२२ (भाग १)/ क्रीयुसे-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
तारीख: १६ मे,२०१७.

वाचा

१) शासन निर्णय क्रमांकः खेआक्ष २०१० / प्र.क.२७२/१०/क्रीयुसे-२, दि.०९ डिसेंबर,२०१०.
२) शासन निर्णय क्रमांकः खेआक्ष २०११ / प्र.क.०६/११/क्रीयुसे-२, दि.२१ मे,२०११.
३) शासन निर्णय क्रमांकः खेआक्ष २०११ / प्र.क.०६/११/क्रीयुसे-२, दि.१० एप्रिल,२०१३.

प्रस्तावना –

राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबतची कार्यपध्दती उपरोक्त अनुक्रमांक ०१ वरील दिनांक ०९.१२.२०१० च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे. त्यानंतर सदर कार्यपध्दतीमध्ये उपरोक्त अनुक्रमांक ०२ वरील दि. २१.०५.२०११ च्या शासन निर्णयान्वये काही अतिरिक्त तरतुदींचा समावेश करण्यात आलेला आहे. दि.०९.१२.२०१० च्या शासन निर्णयामधील कार्यपध्दती नुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील समितीची बैठक दि.१७.१२.२०१६ रोजी घेण्यात आली. या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार कुस्ती खेळ प्रकारातील “महाराष्ट्र केसरी” स्पर्धेत सलग ३ वेळा किताब विजेत्या कुस्तीपटूस गृह विभागाच्या अधिपत्याखालील पदावर थेट नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती व त्याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित केलेल्या उपरोक्त दि.२१.०५.२०११ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद ०१ (अ) अन्वये गट-अ मधील नियुक्ती करीता ग्राह्य धरावयाच्या क्रीडा स्पर्धा निश्चीत करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये अनुक्रमांक ०४ नंतर खालील तरतुदीचा समावेश करण्यात येत आहे :-

“(५) कुस्ती खेळ प्रकारातील “महाराष्ट्र केसरी” स्पर्धेत सर्वप्रथम सलग ३ वेळा किताब विजेत्या कुस्तीपटूस गृह विभागाच्या अधिपत्याखालील गट-अ पदासाठी.”

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०५१७१२१९०३३१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2017.05.17 12:23:59 +05'30'

**(चारुशीला चौधरी)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
७. सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
८. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),
९. सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
११. अवर सचिव, क्रीयुसे-१ क्रीयुसे-३ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती (क्रीयुसे-२).